# मुंबईतील तिसऱ्या मेट्रो गाडीचे ४ डबे आरे कारशेडमध्ये दाखल

■ मुंबई

**मुंबई** मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून ३३.५ किमीच्या भुयारी मेट्रो ३ च्या कामाला तसेच आरे कारशेडच्या कामाला प्रचंड वेग देण्यात आला आहे. या कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गिकेवरील तिसऱ्या मेट्रो गाडीचे चार डबे शनिवारी आरे कारशेडमध्ये दाखल झाले. आता लवकरच आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथून तिसऱ्या गाडीचे आणखी चार डबे मुंबईत दाखल होतील आणि त्यानंतर या डब्यांची जोडणी करून गाडीची चाचणी केली जाईल.

मेट्रो ३ मार्गिकेतील पहिल्या टप्प्यासाठी नऊ गाड्यांची आवश्यकता असून त्यातील दोन गाड्या आणि तिसऱ्या गाडीचे चार डबे आले आहेत. आता लवकरात लवकर उर्वरित गाड्या मुंबईत आणून गाड्यांची चाचणी घेऊन या गाड्या पहिल्या टप्प्यासाठी सज्ज ठेवण्याचा एमएमआरसीचा प्रयत्न असेल.